**<u>ठळक बातम्या</u>**

- अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपवर्गवारी देणं चुकीचं नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

- आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक २०२४ लोकसभेत सादर

- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमातून आदरांजली

- पॅरिस ऑलिंपिकमधे स्वप्नील कुसळेने नेमबाजीत मिळवलं कांस्यपदक

**आणि**

- ज्येष्ठ क्रिकेटपटू अंशुमन गायकवाड यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ

**<><><><><>**

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी राखीव कोट्यामधे आणखी उपवर्गवारी द्यायला हरकत नसल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली ७ न्यायाधीशांच्या पीठानं आज हा निर्णय दिला. अनुसूचित जाती आणि जमातींमधेही आर्थिक आणि सामाजिक स्तरांमधे प्रचंड विविधता असून त्यामुळे सर्व प्रकारच्या मागास वर्गांना एकाच गटात आरक्षण देणं योग्य नाही असं सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालात म्हटलं आहे. त्याचं प्रमाण ठरवण्याचा अधिकार राज्यसरकारांना असून शिक्षण आणि नोकरीत अशा प्रकारचं आरक्षण राज्यसरकारांना देता येईल, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

देशात झालेल्या रेल्वे अपघातांच्या घटनांबद्दल आत्मपरीक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. सभागृहात रेल्वे मंत्रालयाच्या अनुदानाच्या मागणी संदर्भात झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात दरवर्षी १७१ रेल्वे अपघात होत असत, हे प्रमाण ६८ पर्यंत कमी झाल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. २०२२-२३ या आर्थिक वर्षात रेल्वेच्या सुरक्षेसाठी ८७ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आला, हा खर्च मागच्या वर्षी ९७ हजार कोटींपर्यंत गेला. यंदाच्या अर्थसंकल्पात सुरक्षेवरच्या खर्चासाठी एक लाख आठ हजार रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रेल्वेसाठी अर्थसंकल्पात पुरेशा निधीची तरतूद केल्याबद्दल वैष्णव यांनी त्यांचे आभार मानले. रेल्वेच्या परिचालनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ लाखांवर रेल्वे कर्मचाऱ्यांचेही त्यांनी आभार मानले.

देशभरातल्या १५ विमानतळांवर डिजियात्रा हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनी दिली. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना ते उत्तर देत होते. डिजियात्रा उपक्रमामुळे प्रवाशांचा विमानतळावरचा वावर सुलभ होतो, असं त्यांनी सांगितलं. हा उपक्रम लवकरच आणखी १२ विमानतळांवर सुरू होणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

हिंदकेसरी ठरलेल्या कुस्तीगीरांना राज्य सरकारचं अनुदान गेल्या ११ वर्षांपासून मिळालेलं नाही, हा मुद्दा राज्यसभेत खासदार रजनी पाटील यांनी उपस्थित केला. खेळाडूंचं वर्तमान आणि भविष्य सुरक्षित करावं, यादृष्टीनं विशेष नियामक मंडळ स्थापन करावं, अशी मागणी रजनी पाटील यांनी केली.

देशात निवडणूक लढवण्यासाठी किमान वयाची अट २५ वर्षांवरून २१ वर्ष करण्याची मागणी आम आदमी पार्टीचे खासदार राघव चढ्ढा यांनी केली आहे. शून्यकाळात बोलतांना चढ्ढा यांनी, तरुणांनी सक्रीय राजकारणात येण्यास प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने हा बदल करावा, असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आपत्ती व्यवस्थापन (सुधारणा) विधेयक २०२४ आज लोकसभेत सादर केलं. या विधेयकाअन्वये २००५च्या आपत्ती व्यवस्थापन कायद्यात बदल करून राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांची कार्यपद्धती बळकट करण्यात येईल. जल जीवन मिशनअंतर्गत देशभरात १५ कोटीपेक्षा जास्त नळ जोडण्या देण्यात आल्याची माहिती जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली.

दरम्यान, वायनाडमध्ये दरड कोसळून झालेली दुर्घटना ही गंभीर स्वरूपाची दुर्घटना म्हणून सरकारने घोषित करावी, अशी मागणी काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी केली. यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहिलं असल्याचं त्यांनी संसद भवनाच्या आवारात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. सरकारनं ही घोषणा केल्यानंतर खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत मदत आणि पुनर्वसनाच्या कामासाठी एक कोटी रुपये देणार असल्याचंही थरूर यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

लोकमान्य टिळक यांच्या शतकोत्तर चौथ्या पुण्यतिथी निमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या शतकोत्तर चौथ्या जयंती दिनानिमित्त त्यांना सर्वत्र आदरांजली वाहण्यात येत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात लोकमान्य टिळक आणि  अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली वाहिली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्याद्वारे जनजागृती करणाऱ्या ज्येष्ठ मराठी साहित्यिक, विचारवंत, समाजसुधारक आणि थोर लोकनाट्यकार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीदिनी वंदन करत असल्याचं मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात लोकमान्य टिळक यांना अभिवादन केलं आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे खंबीर नेतृत्व आणि आधुनिक भारताचे शिल्पकार लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन, असं फडणवीस यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही लोकमान्य टिळक यांना समाज माध्यमावरच्या संदेशात आदरांजली वाहिली आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी घोषणा देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन, असं पवार आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या जयंती दिनी आदरांजली वाहिली. वंचित, शोषितांचा आक्रोश शब्दातून मांडणारे थोर समाजसुधारक, लेखक, 'लोकशाहीर' साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीदिनी कोटी कोटी अभिवादन, असं देवेंद्र फडणवीस आपल्या समाज माध्यमावरच्या

संदेशात म्हणाले आहेत. तसंच, चेंबूरमधल्या सुमन नगर इथं अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लोकशाहीरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य सेवेद्वारे मराठी साहित्य जागतिक पातळीवर पोहोचवले. साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन, असं पवार आपल्या संदेशात म्हणाले.

आज राज्यभरातल्या विविध शासकीय कार्यालयांमध्येही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली वाहण्यात आली. नांदेड इथं माजी मुख्यमंत्री आणि खासदार अशोक चव्हाण यांनी अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केलं. धुळे इथं जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचं पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. रत्नागिरी इथल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लोकशाहीरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज बीड शहरात साहित्य दिंडी व साहित्याची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावानं आकाशातल्या ताऱ्याची नोंदणी करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरचे उद्योजक सुशील तुपे यांनी अमेरिकेतल्या आंतरराष्ट्रीय तारे आणि अवकाश नोंदणी संस्थेत लोकशाहीरांच्या नावानं तारा नोंद केला आहे. आजपासून स्मार्टफोनवर ॲप्लिकेशनच्या माध्यमातून हा तारा पाहता येणार आहे.

**<><><><><>**

अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचं उद्घाटन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालं.

अन्यायाची जाणीव करून देणं आणि त्याविरोधात लढण्याची प्रेरणा देण्याचं काम अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यानं केलं. त्यांच्या साहित्यानं राज्यात क्रांतीकारक परिवर्तन घडवून आणलं, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सरकार निर्णय घेतं, त्यानुसारच अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताच्या स्वप्निल कुसळेनं पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजी प्रकारात कास्यपदकाला गवसणी घातली. त्यानं ४५१ पूर्णांक ४ दशांश गुणांची कमाई केली. चीनच्या युकुन लिऊ यानं सुवर्ण, तर युक्रेनच्या सेरही कुलिश यांनी रौप्यपदक पटकावलं. पॅरिस ऑलिम्पिकमधलं भारताचं हे तिसरं कास्यपदक आहे आणि ही तिन्ही पदकं नेमबाजी स्पर्धेत मिळालेली आहेत. दुसरीकडे पुरुष हॉकी संघाचा सामना बेल्जियमशी सुरू आहे.

शिवाय, बॅडमिंटनच्या मैदानावरचा आजचा दिवस भारतासाठी महत्त्वाचा आहे. पुरुष दुहेरीत आज उपांत्यपूर्व फेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही फॉर्ममध्ये असलेली जोडी मैदानात उतरेल. तर पुरुष एकेरीत एच. एस. प्रणॉयचा सामना भारताच्याच लक्ष्य सेनशी होईल. तर महिला एकेरीत दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू पुढच्या फेरीत जाण्यासाठी प्रयत्नशील असेल. याशिवाय मुष्टियुद्ध स्पर्धेत निखत जरीन, तिरंदाजीत प्रवीण जाधव आज

मैदानात उतरतील. दरम्यान, मुष्टियोद्धा निशांत देव यानं उपांत्यपूर्व फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे.

ऑलिम्पिकच्या सुवर्णपदकतालिकेत आत्तापर्यंत चीन सर्वोच्च स्थानी आहे. चीनच्या खात्यात ८ सुवर्ण, ७ रौप्य आणि तीन कास्य अशी एकंदर १८ पदकं जमा आहेत. जपान ८ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कास्यपदकं अशा १५ पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर फ्रान्स २५ पदकांसह तिसऱ्या स्थानी आहेत. फ्रान्सनं ७ सुवर्ण, १० रौप्य आणि ८ कास्यपदकं जिंकली आहेत. भारतानं आत्तापर्यंत दोन कास्यपदकांवर नाव कोरलं आहे आणि ही दोन्ही पदकं नेमबाजीतली आहेत.

**<><><><><>**

प्रसिद्ध क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक अंशुमन गायकवाड यांच्या निधनाबद्दल क्रिकेट जगतात आणि क्रिकेट रसिकांमधे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला असून आदरांजली वाहिली आहे. क्रिकेटमध्ये दिलेल्या योगदानाबद्दल गायकवाड दीर्घकाळ स्मरणात राहतील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे. आपल्या खेळानं आणि कौशल्यानं भारतीय क्रिकेटचा गौरव वाढवणारा क्रिकेटपटू, अशा शब्दात केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी गायकवाड यांना श्रद्धांजली वाहिली आहे. गायकवाड यांचं क्रिकेटप्रति समर्पण अद्वितीय असल्याचं बीसीसीआयचे अध्यक्ष आणि १९८३ च्या क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघातले त्यांचे साथीदार रॉजर बिन्नी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. गायकवाड यांच्या निधनानं भारतीय क्रिकेट विश्वाची अपरिमित हानी झाल्याचं बीसीसीआय चे सचिव जय शहा यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय वनसेवा अधिकारी शोमिता बिस्वास यांनी काल नागपूर इथं महाराष्ट्राच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक पदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारला. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला प्रधान मुख्य वनसंरक्षक बनल्या आहेत. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बिस्वास यांचं स्वागत केलं. राज्याच्या मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि आता प्रधान मुख्य वनसंरक्षक महिला असणं ही अभिमानाची बाब असल्याचं मुनगंटीवार म्हणाले. बिस्वास या सध्या  पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन आणि प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यात धरण क्षेत्रात अद्यापही अतिवृष्टी होत असून राधानगरी आणि वारणा धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. जिल्ह्यातले ७५ बंधारे पाण्याखाली असून, २३ मार्ग बंद आहेत. सांगली जिल्ह्याच्या धरणक्षेत्रातही पाऊस सुरू आहे. कोयना धरणातील विसर्ग वाढल्यामुळे आयर्विन पुलाजवळ नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे.

**पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर आणि सातारा** जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पुढले काही दिवस जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. **कोकण किनारपट्टी, पुणे आणि कोल्हापूरमध्ये** पावसाचा जोर वाढेल, तर **मध्य महाराष्ट्रात,** विशेषतः घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे. दरम्यान, हवामान विभागानं आज **मुंबई आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्याला यलो अलर्ट, तर **ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि रायगड** जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**